नियमित फौजदारी खटला क्र. ३८/२०२२

नि. क्र. १५

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक –१ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव —** मुकुंद बाबुराव आंगचेकर

**वय** – ५० वर्षे **धंदा** – शेती

**राहणार —** तळवडे, परबवाडी, ता. सावंतवाडी

**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. जी. एन. पाटोळे यांचेतर्फे –**

१. वर नमुद पत्त्यावर मी, माझा भाऊ, पुतणे व त्याची मुलगी असे एकत्र रहातो. आम्ही शेती व्यवसाय करतो. मी शेळी पालनाचा व्यवसाय सुरु केला होता. मी माझ्या शेतीमध्ये पत्र्याची शेड व तारेचे कुंपण तयार केले होते. त्यामध्ये ९ शेळया, ३ बकरे व ८ पिल्ले होती. माझ्या शेळया कधी चोरीला गेल्या हे माझ्या लक्षात नाही. माझ्या शेळया कोणी चोरल्या ते मला माहिती नाही. मी अज्ञात इसमाविरुध्द तक्रार दिली होती. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तिच आहे. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सबब सहिस **निशाणी १६** देणेत येत आहे.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांनी त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारणेची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २७/३/२०२२ रोजी माझ्या शेळया चोरीला गेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८/३/२०२२ रोजी देवदुत शंकर परब याने मला फोन करुन सांगितले की, आजगांव येथील गायरान काजुच्या बागेत माझ्या शेळया चरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २९/३/२०२२ रोजी एक इसम गायरान काजुच्या बागेत दिसून आला. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी माझ्या शेळया मला दिसून आल्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी पंचनामा करुन शेळया माझ्या ताब्यात दिल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी उपस्थित असलेल्या इसमाचे नांव लक्ष्मण शेळके असल्याचे मला समजले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेळया आरोपीने चोरल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपीसोबत तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

नियमित फौजदारी खटला क्र. ३८/२०२२

नि. क्र. १५ लगत

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. व्ही. एस. चव्हाण यांचेतर्फे –</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरसमजुतीतुन आरोपीविरुध्द केस दाखल केली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

(जे.एम.मिस्त्री)

दि. २४/२/२०२६

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ सावंतवाडी.